# मनोगत

'गोवा' या प्रदेशात मी जन्मले. या प्रदेशाने मला जगणे शिकविले. या प्रदेशाच्या निसर्गाच्या कुशीत वाढत असताना इथल्या मातीतील कला, इथल्या जीवनावर निर्माण झालेले साहित्य याचा आस्वाद घेत असताना एक अभिरुचीसंपन्न मन या प्रदेशाने घडविले. घरात कोंकणी भाषिक असले तरी या मातीत रुजलेल्या बहुभाषिक संस्कृतीच्या अस्मितेत मी वाढले. मराठी अभंग, गीतांची आवड असलेल्या कुटुंबीयांमुळे गोमंतकाच्या मराठी संस्कृतीशी लहानपणापासून समरस होत गेले. प्राथमिक शिक्षण मराठी शाळेत झाल्यामुळे व आईलाही मराठी भाषेची व त्या स्वतः शाळेत शिकत असताना मराठी या विषयाची आवड असल्यामुळे मराठी विषयाची गोडी विशेषतः तिनेच लहानपणी लावली आणि पुढे लाभलेल्या शिक्षकांमुळे भाषेविषयीची आवड वाढतच केली.

शिक्षकीय कारकीर्दीची सुरूवात गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागात झाली. प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याने साहित्य व संशोधन या विषयाचे महत्त्व समजत गेले. साहित्याची आवड होतीच पण प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात असताना साहित्याची व संशोधनाची गरज पदोपदी लक्षात आली. गोवा विद्यापीठातील ज्येष्ठ निवृत्त प्राध्यापक वर्ग व मी विद्यार्थिनी असताना लाभलेल्या प्राध्यापक वर्गाकडून संशोधन कार्य अविरत चालू होते आणि त्यामुळे मराठी संशोधन क्षेत्रात कार्य करण्याची जबाबदारी आपली असल्याचे लक्षात आले. मराठी संस्कृती नांदत असलेल्या गोव्यास समृद्ध अशी साहित्य परंपरा लाभल्याने व कथा हा माझा अत्यंत आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय असल्याकारणाने गोमंतकीय मराठी साहित्यविश्वात नव्वदोत्तरी कालखंडात बऱ्याच प्रमाणात कथेच्या प्रांतात भर पडलेली जाणवली. गोव्यातील नव्वदोत्तरी प्रश्नांना कवेत घेणारी, साधी, सरळ पण ओघवत्या शैलीत नव्वदोत्तरी गोमंतकाशी जुळलेल्या नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा अभ्यास होणे आवश्यक वाटल्याकारणाने शेवटी 'नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा: एक चिकित्सक अभ्यास (प्रातिनिधिक कथाकारांच्या कथांच्या अनुषंगाने)' असा विषय घेत या विषयावर कार्य करायचे असल्याचे शिक्कामोर्तब झाले. मागच्या साडेतीन वर्षात या विषयाचा सांगोपांग धुंडाळा घेण्याचा प्रयत्न केला.

या संशोधन प्रवासात अनेकांचा हातभार लाभला. अनेकांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनामुळे विषयाचा अभ्यास चांगल्या पद्धतीने पार पाडण्यास मदत झाली. या प्रवासात सुरूवातीपासून सोबत चालत मार्गदर्शन करणारे माझे मार्गदर्शक व गुरुस्थानी असलेले प्रोफेसर डॉ. संजयकुमार करंदीकर सरांचे आभार मानण्यापेक्षा

ऋणात राहणे पसंत करेन. गोव्यातून बडोद्यातील विद्यापीठात पीएचडी पदवीसाठी नोंदवणे हा विचार करणे कठीण होते. पण सरांनी आपल्या अत्यंत शांत व संयमी स्वभावाने सर्व तंत्रिक गोष्टी स्वतः सांभाळत नोंदणीसाठी मदत केली. त्यानंतर निवडलेला विषय कशा पद्धतीने पुढे जाऊ शकेल, विषयासाठी लागणारी साधनसामग्री, संदर्भ ग्रंथ, लिखाणानंतर वेळोवेळी सरांकडून विषयाबद्दल मिळणाऱ्या टिपा टिपण्या, तसेच कधी कौतुकाची थाप तर कधी काम मागे पडताना पदोपदी पुढे जाण्यास आपला संयमी स्वभाव ढळू न देता दिलेली प्रेमळ धाक, या सगळयातून सरांच्या मार्गदर्शनामुळे हा प्रवास खूप सुखकर झाला. आदरणीय प्रोफेसर करंदीकर सरांना सर्वप्रथम माझे वंदन. गोवा विद्यापीठात कार्यरत असल्यामुळे अभ्यासाला गती मिळावी म्हणून माझ्या संशोधनकार्यासाठी मला सहा महिन्यांची अभ्यास रजा मंजूर केल्याने मी गोवा विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. हरिलाल मेनन, कुलसचिव प्रोफेसर डॉ. व्ही. एस. नाडकर्णी, आमच्या महाशाळेच्या अधिष्ठाता प्रोफेसर डॉ. अनुराधा वागळे, उपाधीष्ठाता (शैक्षणिक) प्रोफेसर डॉ. वृषाली मांद्रेकर, उपाधीष्ठाता (संशोधन) डॉ. प्रकाश पर्येकर यांचे मी विशेष आभार मानते.

सहा महिन्यांची रजा मंजूर झाल्यानंतर विद्यापीठातील माझ्या जबाबदाऱ्या स्वतःवर घेत मला अनेक जबाबदाऱ्यांपासून मुक्त करत मला दिलेल्या सहकार्यामुळे व वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे मी मराठी अध्ययनशाखेचे संचालक प्रा. विनायक बापट, प्राध्यापकवर्ग डॉ. सुनिता उम्रस्कर, डॉ. विनय मडगांवकर, प्रा. चिन्मय घैसास, डॉ. हेमंत अय्या, प्रा. जयेश गांवकर यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच. मराठी भाषेची आवड निर्माण करणाऱ्या माझ्या शाळेतील शिक्षिका सौ. दीपा भांडणकर, पुढे महाविद्यालयात व गोवा विद्यापीठात मराठी साहित्याची व संशोधनाच्या व्यापकतेची ओळख घडवून आणणारे प्राध्यापक वर्ग प्रा. आशा मनगुटकर, डॉ. अशोक मनगुटकर, डॉ. बाळकृष्ण कानोळकर, डॉ. सुनीता उम्रस्कर, डॉ. गीता येर्लेकर, डॉ. विनय मडगांवकर या प्राध्यापकांचे मी अत्यंत ऋणी आहे. महाविद्यालयात लाभलेले गुरुवर्य डॉ. हेमंत अय्या यांच्याकडून मिळालेली प्रेरणा, त्यांचे लाभलेले सततचे मार्गदर्शन, अडल्या-नडल्या ठिकाणी वेळप्रसंगी स्वतः हात धरून तारणारे, सरांकडून मिळणारे मार्गदर्शन, आपुलकी व सोबत सरांची सहचारिणी सौ. सुश्मिता देसाई यांच्याकडून मिळणारे प्रेम यासाठी शब्द तोकडे पडावेत.

माझ्या या प्रवासात माझा भरभक्कम आधार म्हणजे माझे कुटुंबीय. मी चांगली शिकावे म्हणून लहानपणापासून जातीने लक्ष देणारी माझी आई व माझ्या शिक्षणासाठी रात्रंदिवस कष्ट करणारे माझे बाबा. स्वतःसाठी न जगता आम्हा मुलांसाठी जगणारी ही माझी दोन दैवते, आई सौ. वृंदा वस्त व बाबा श्री. पंडित वस्त

यांचा आशीर्वाद व भरभरून प्रेम सदैव मिळो ही प्रार्थना. माझा भाऊ प्रतीक माझ्यापेक्षा लहान असला तरी कधी मोठा भाऊ बनत मला योग्य वाट दाखवतो याचे खरंतर खूप अप्रूप आहे. आपली नात प्राध्यापक असल्याचा अभिमान बाळगणारे आजोबा श्री. देवेंद्र वस्त यांच्यामुळे अजून खूप कार्य करण्याची ऊर्जा मिळते व माझे अख्खे कुटुंब हे माझे ऊर्जास्रोत असल्याचे वाटते. या संशोधनाच्या प्रवासात एका नव्या कुटुंबाची भर आयुष्यात पडली व या कार्यात माझा पाठीराखा व भक्कम आधार बनले श्री केवल नाईक. त्यांची साथ मला अशीच मिळणार हे माझं खूप मोठा बळ आहे. त्याचबरोबर सदैव प्रोत्साहन देणारे माझे होणारे सासू-सासरे सौ. करिष्मा नाईक व श्री कृष्णनाथ नाईक व लहान बहिणीसमान असलेली कु. कृतीक्षा या सर्वांची या ठिकाणी मी कृतज्ञता व्यक्त करते.

मला लाभलेला खूप मोठा मित्रपरिवार ज्यांना माझी पीएचडी लवकर पूर्ण होणार हा त्यांचा माझ्यावरचा विश्वास माझ्यापेक्षाही जास्त, अशा माझ्या मित्र-मैत्रिणी स्नेहा देसाई, सुप्रिया काणकोणकर, सोनिया गडकर, मनीषा गावडे, राधिका नागवेकर, सिद्धी सावर्डेकर, सुष्मिता मोपकर, दत्तराज नाईक, अंजली नाईक, मंगेश हरिजन या मित्रमंडळींमुळे सततचे पाठबळ लाभले. आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे माझ्यावर खूप माया करणारे विद्यार्थी ज्यांनी या सगळ्या प्रवासात खूप सकारात्मकता दिली. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथाकारांचा अभ्यास करत असताना या कालखंडात लिहिणारे विठ्ठल गांवस, दयाराम पाडलोस्कर, नारायण महाले, चंद्रकांत गावस, उदय नाईक, गजानन देसाई, मिलिंद म्हामल अशा काही कथाकारांसोबत झालेल्या बोलण्यातून सापडलेले अनेक धागेदोरे संशोधनातही महत्त्वाचे ठरले. मुद्रणात असलेले अनेक दोष मुद्रितशोधनातून दूर करणाऱ्या सौ. वैशाली नवघरे, संदर्भ ग्रंथांचा व आधार ग्रंथांची शोधाशोध करताना गोवा विद्यापीठाचे वाचनालय कर्मचारी व गोवा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई, कृष्णदास शामा मध्यवर्ती वाचनालय पणजी, तालुका वाचनालय कुडचडे येथील ग्रंथपाल व कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले त्यामुळे त्यांचे इथे आभार मानते.

माझे ग्रामदैवत, गावाचा राखणदार पुरुषम्हारू, कुलदैवत भगवती – बेताळ यांचा वरदहस्त माझ्यावर असल्याचे मी मानते. या दैवतांना वंदन करत, सर्वांच्या सहकार्यामुळे, भरभरून मिळणाऱ्या आशीर्वाद व प्रेमामुळे मी हे संशोधन कार्य पूर्णत्वास नेत आहे. आपणा सर्वांचे प्रेम, आशीर्वाद व भावी संशोधन कार्य करण्याचे बळ व प्रेरणा ईश्वराकडून सदैव प्राप्त होवो हीच मनोकामना.

दिनांक: - पूर्वा पंडित वस्त